# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## दी.अ.यो.राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
## // फेर जाहीर प्रकटन//
## नगर पथविक्रेत्यांच्या अधिकाराचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्यांचे नियमन २०१४ च्या अनुषंगाने शहर फेरीवाला समिती सदस्य नियुक्ती बाबत

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही / उपाययोजना करणेबाबत महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांनी पारीत केलेल्या शासन निर्णय क्र.राफेधो-२०१३/प्र.क्र.३९/नवि ३४ दि.३१ ऑक्टोंबर २०१३ चे आदेशान्वये तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दि.०३/११/२०१७ रोजी दिलेल्या आदेशान्वये "नगर पथविक्रेता समिती" गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.खालील नमुद प्रवर्गातील नियुक्ती करीता इच्छुक प्रतिनिधी कडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | प्रवर्ग | तपशील | पद |
|---|---|---|---|
| १ | २ | भिवंडी निजामपूर शहरातील विविध फेरीवाला संघटनांच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान ४० टक्के म्हणजेच १२ इतके प्रतिनिधी. | सदस्य |
| २ | ३ | भिवंडी निजामपूर शहरातील विविध रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन,समुदाय आधारीत संघटना (कम्युनिटीबेस ऑर्गनाझेशन) या संघटनांच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान २० टक्के म्हणजेच ०६ इतके प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | ४ | भिवंडी निजामपूर शहरातील विविध इतर नागरी (सिव्हिल) संस्था/संघटना,जशा व्यवसायिक समुहातील प्रतिनिधी जसे वकील,डॉक्टर,नगररचनाकार,आर्कीटेक्ट इ.व्यापार व वाणिज्य समूहातील प्रतिनिधीमधून फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान २० टक्के म्हणजेच ०६ इतके प्रतिनिधी | सदस्य |

वरील संघटना/संघ यांची नियुक्ती खालील निकषाच्या आधारावर सर्व सदस्यांचे नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात येतील.

१) संघटनेची किंवा संघाची सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेल्याचे तिन वर्षापुर्वीचे प्रमाणपत्र.

२) संघटना किंवा संघ मागील तीन वर्षाचे (सन २०१४-१५,२०१५-१६,२०१६-१७) सक्षम प्राधिकरणाकडुन तयार करण्यात आलेले लेखापरिक्षण अहवाल सादर करील.

३) संघटना किंवा संघ यांना,त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.

४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायदयान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.

५) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नसावे.

तरी वर नमूद केलेल्या भिवंडी निजामपुर शहरातील अशा संघ/संघटना यांचे प्रातिनिधी यांना नगर पथविक्रेता समितीवर वरिल नमूद निकषा प्रमाणे सदस्य म्हणून नियुक्ती करावयाची आहे. उक्तनमूद प्रवर्गातील एकूण सदस्य संख्ये पैकी किमान १/३ सदस्य (एकूण १०) या महिला सदस्य असतील.आपला अर्ज दी.अ.यो.रा.ना.उ.अ. विभाग, ६ वा मजला नविन प्रशासकिय ईमारत,जुना एस.टी.स्टॅण्ड,कापआळी,भिवंडी - ४२१ ३०२, जि.ठाणे.येथे दि.२१/११/२०१८ दु. ४.०० वा. पर्यत जमा करावे.

मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने.

(श्री.पंढरीनाथ वेखंडे)
उप आयुक्त (प्र)(दी.अ.यो.रा.ना.उ.अ.)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी